Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 302-306
DOI: 10.5281/zenodo.10125263

Original Research Article

# महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचारांची समर्पकता : एक अभ्यास

प्रा. डॉ. राजेश्री अप्पाराव जाधव

विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर ४१३५१५ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail* : rajadhav75@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

महात्मा गांधी यांनी देशातील आर्थिक सामाजिक राजकीय कार्याला व चिंतनाला एक नवी दिशा प्राप्त करून दिली. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत 1920 ते 1948 हा कालखंड गांधीयुग या नावाने ओळखला जातो लोकमान्य टिळकांचे निधन 1 मे 1920 झाले. अधिकार सूत्रे महात्मा गांधी कडे आले तेव्हापासून गांधी युगाला सुरुवात झाली भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात प्रमुख नेते म्हणून गांधीजीचे कर्तुत्व अगाध स्वरूपाचे होते . महात्मा गांधी मवाळ व जहाल या दोन्ही विचारसरणीचे ते वारसदार होते त्यांनी दोन्ही विचारसरणीत समन्वय घडवून आणला आणि त्या विचारांना गतिमान व व्यावहारिक वळण दिले. गांधीजींनी आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्राच्या विकासासाठी खर्ची घातले आयुष्यभर देशाच्या प्रगतीचाच विचार केला ते फक्त स्वातंत्र्य येऊ देच नव्हते तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक पैलू होते ते एक समाज सुधारक शिक्षण तज्ञ राजकीय विचारवंत अर्थतज्ञ धर्मवक्ते अशी थोरवी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची होती. सत्य शिव आणि सुंदर या तीन चिरंतर मूल्यावर त्यांची खूप श्रद्धा होती भगवद्गीता आणि बायबल या दोन ग्रंथाचा त्यांच्या मनावर फार मोठ्या प्रभाव होता 1920 ला असहकार चळवळ 1930 ला दांडी यात्रा 1940 ला सविनय कायदेभंगाची चळवळ 1972 ला चलेजाव घोषणा 15 ऑगस्ट 1947 ला भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे स्वप्न त्यांनी स्वतः साकार केले. रस्किन यांच्या. "un to the Last" या पुस्तकाने गांधीजीच्या जीवनात फार मोठे परिवर्तन घडून आले महात्मा गांधीजींना गोखले यांना राजकीय क्षेत्रातील गुरुस्थानी मानले जनतेचे विकासासाठी त्यांनी अनेक आर्थिक विचार मांडले आजच्या जागतिकरणाचे प्रक्रियेत त्यांनी मांडलेले विचार हे अतिशय महत्त्वाचे आहेत बऱ्याच देशाची अर्थव्यवस्था मोडकळी झाली त्यावर गांधीजींनी स्वदेशी म्हणजे देशाची स्वयंपूर्णता असा मंत्र दिला जागतिक मंदीचा सामना करण्यासाठी देशांतर्गत उत्पादन व मागणीला महत्त्व देणे गरजेचे आहे गांधीजींनी जी विचार मांडले त्याचा सविस्तर आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

### उद्दिष्ट

१. महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.
२. गांधीजीच्या ग्रामस्वराज्य आणि स्वदेशी या संकल्पनेचा अभ्यास करणे.
३. ग्रामीण विकास व उद्योगाचे केंद्रीकरण यांचे महत्त्व अभ्यासणे.
४. सद्य परिस्थितीत गांधीजीच्या आदर्शवादी मुल्यांच्या गरजांचे अवलोकन करणे.

### गृहितक

महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांची समर्पकता आजच्या काळातही असल्याचे दिसून आले.

### संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनात दुय्यम साधनसामग्री चा आधार घेतलेला आहे.त्यात महात्मा गांधीजींच्या विचारांशी व जीवनाशी निगडित विविध प्रकारचे लेख, आर्थिक विचारावंतावर आधारित पुस्तके, मासिके साप्ताहिके वेबिनार मासिक, त्याचबरोबर संकेत स्थळावरच्या माहितीचा आधार घेऊन संशोधन केले आहे.

### महात्मा गांधीजीचे आर्थिक विचार

खाजगीकरण उदारीकरण जागतिकीकरण व आधुनिकीकरण या संदर्भात गांधीजींची आर्थिक विचार हे अत्यंत मौलिक आहेत वास्तव परिस्थितीत आणि बदलत्या परिस्थितीत गांधीजीच्या आर्थिक विचारांची नितांत आवश्यकता आहे गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास हा त्यांच्या नैतिकवाद्यात्मिक सिद्धांतावर आधारलेला आहे.

#### १) ग्रामस्वराज्य

स्वराज्य मार्ग हा त्यागाचा मार्ग आहे.त्याशिवाय कोणत्याही देशाला कधीही स्वातंत्र्य मिळाले नाही.स्वदेशी हे व्यक्ती व समाजाकरीता एक व्रत आहे. महात्मा गांधीजींनी खेड्याकडे चला असा संदेश दिला त्यावेळी सुद्धा ग्रामीण अर्थव्यवस्था महत्त्वाची होती आणि आज सुद्धा देशातील प्रत्येक शहरात वाढत जाणारा रोजगाराचा प्रश्न वाढती गर्दी गुन्हेगारी यामुळे गांधीजीचा खेड्याकडे चला हा संदेश आजही आर्थिक समस्येचे निराकरण करण्याचा मार्ग सुचवतो देशातील बहुसंख्य जनता प्रत्यक्ष प्रत्यक्षरीत्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहे. भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो आणि भारताचा विकास हाच भारतातील खेड्यांच्या विकासावर अवलंबून आहे खेडी समृद्ध झाली पाहिजे असे गांधीजीचे मत होते जोपर्यंत खेड्यामध्ये अन्न शिक्षण आरोग्य राहणीमान बेकारी दारिद्र्य उपासमार हे प्रश्न सुटत नाहीत तोपर्यंत ग्रामस्वराज्य निर्माण होणार नाही खेड्यांचे पुनरुजीवन झाले पाहिजे गांधीजीची ग्रामस्वराज्याची संकल्पना सफल यशस्वी करण्यासाठी स्वयंपूर्ण स्वयंशासित स्वावलंबी सामुदायिक विकास सार्वभौम खेडी निर्माण करून विकेंद्रीत लोकशाही वर आधारित ग्रामस्वराज्याचे संघराज्य स्थापन करण्याचे विचार मांडले खेड्याकडे चला असा संदेश गांधीजींनी दिला अहिंसा सहकार समता विश्वस्तांची भूमिका ही ग्रामस्वराज्याची चतुसूत्री आहे. खेड्यांचा विकास या तत्त्वावर गांधीजीचे अर्थशास्त्र अवलंबून आहे. त्यांच्या मते देशाचा विकास होण्यासाठी प्रत्येक खेडे हे आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावे असा गांधीजीचा आग्रह होता खेड्यामध्ये लघु कुटूर उद्योगाचा विकास झाला पाहिजे त्यामुळे खेड्यातील लोकांना रोजगारासाठी शहराकडे जावे लागणार नाही ग्रामीण भागातच कृषी आधारित उद्योग सुरू झाले पाहिजे, कारण उद्योगधंद्यासाठी लागणारा कच्चामाल गावातच उपलब्ध होतो त्यामुळे ग्रामीण खेडी स्वयंपूर्ण होतील. गांधीजीची ग्रामस्वराज्याची संकल्पना आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण खेड्यावर आधारलेली होती. गांधीजींनी ग्रामस्वराज्य संकल्पनेत आदर्श खेड्याची वैशिष्ट्ये सांगितली. त्यामध्ये

१. प्रत्येक खेडे आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण असावी

२. खेड्याची रचना व्यवस्थापन असावी
३. खेड्यातली जाती व्यवस्था आहे ती नष्ट व्हावी.
४. प्रत्येक खेडे अन्न वस्त्र निवारा याबाबत स्वयंपूर्ण असावे.
५. प्रत्येक खेड्यात गुरांसाठी गोठे असावीत .
६. प्रत्येक खेड्यामध्ये फळे फुलझाडे बागा स्वच्छ रस्ते सांडपाण्याची व्यवस्था आरोग्यविषयक
७. सुविधा उपलब्ध असाव्यात
८. मुलांना खेळण्यासाठी मैदानी असावीत .
९. खेड्यात स्थानिक बाजारपेठा असाव्यात शेती व्यवसाय प्रगत असावा.
१०. व्यक्ती स्वातंत्र्यावर आधारलेली पूर्ण लोकशाही असावी .
११. खेड्यात मूलभूत शिक्षण सक्तीचे असावे.
१२. ग्रामीण भागात असणारे आरोग्य शिक्षण दारिद्र्य या समस्या सोडवल्या तरच ग्रामीण भागाचे व ग्रामीण खेड्याचे पुनरुज्जीवन होते असा विश्वास गांधीजींना वाटत होता.

**२) स्वदेशी**

स्वदेशीचा फार व्यापक आणि देशाच्या प्रगतीसाठी समर्पक अर्थ गांधीजींनी आपल्यासाठी ठेवला स्वदेशी म्हणजे देशाची स्वयंपूर्णता असा अर्थ आपल्यासमोर ठेवला स्वदेशी ही संकल्पना गांधीजीच्या आर्थिक विचारांचा मुख्य आधार आहे विदेशी वस्तूवर बहिष्कार घालून स्वदेशी उद्योगाला संरक्षण देणे या चळवळीच्या पाठीमागचा महत्त्वाचा उद्देश आहे भारतातच तयार होणाऱ्या वस्तूचा वापर केला पाहिजे देशातील उद्योगाचा विस्तार व विकास होतो त्यामुळे लोकांचे उत्पन्न वाढते लोकांना रोजगार उपलब्ध होतो देशातली संपत्ती देशातच राहते देश सुजलाम सुकलाम होईल यासाठी गांधीजींनी स्वदेशीची संकल्पना मांडली नफ्याच्या रूपाने विदेशात जाणारी संपत्ती देशातच राहू शकते स्वदेशी वस्तूच्या वापरातूनच देशी उद्योगाला चालना मिळते सध्याच्या काळात वाढत्या कच्च्या तेलाच्या किमती यामुळे देशाची आयात व्यापार तूट परदेशी चलनाच्या तुलनेत रुपयाचे घटते मूल्य या सर्व समस्यांच्या मुळाशी गांधीजीच्या संकल्पनेतील स्वदेशी मूल्याचे महत्त्व समजून येते.

**३) विश्वस्ताची कल्पना**

विश्वस्ताची कल्पना म्हणजेच अहिंसक मार्गाने देशात आर्थिक समता प्रस्थापित करणे होय भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे दोष कमी करण्यासाठी गांधीजींनी विश्वस्ताची कल्पना मांडली संस्थानिकांनी स्वतःला प्रजेच्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून जनतेच्या कल्याणासाठी राजाच्या उत्पन्नाचा विनीयोग कसा करावा असा सल्ला गांधीजींनी 1916 मध्ये बनारस विश्व हिंदू विद्यापीठाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना दिला वर्ग संघर्ष त्यांना मान्य नव्हता. विश्वस्ताची कल्पनाही आदर्श संकल्पनाच आहे त्यात जमीनदार भांडवलदार श्रीमंतांनी व व्यापाऱ्यांनी त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नाचा त्यांच्या दैनंदिन गरजांच्या पूर्ततेसाठी जेवढा खर्च अपेक्षित आहे तेवढाच भाग त्यातून काढून घ्यावा आणि शिल्लक रक्कम जनतेच्या कल्याणासाठी खर्च करावी गांधीजीच्या मते श्रीमंत आणि आपली संपत्ती वाटेल तशी वापरू नये ते ज्या समाजात राहतात वास्तव्य करतात त्या ठिकाणी समाजाचे भान ठेवावे व आपला पैसा स्वतःसाठी न वापरता तो सर्व समाजासाठी वापरावा श्रीमंत व गरीब यांच्यात विश्वास निर्माण झाला तर आर्थिक समतेचे ध्येय सहज साध्य होते जमीनदार व भांडवलदार यांना शेतकरी व श्रमिक यांची विश्वस्त म्हणून काम पाहावे संपत्ती समाजाच्या गरजेनुसार समाजाला पुरवणे आवश्यक आहे असे मूलगामी विचार महात्मा गांधींनी मांडले.

### ४) ग्रामोद्योग

खेड्यातील लोकांच्या विकासासाठी अर्थात खेड्यांच्या विकासासाठी महात्मा गांधीजींनी शेती आणि खादी सारख्या ग्राम उद्योगाला महत्त्व दिले. महात्मा गांधीजींच्या मते ग्राम उद्योगामुळे आमच्या रोजच्या आवश्यक गरजांची पूर्तता खेड्यातच होते देशाच्या अर्थव्यवस्थेत ग्राम उद्योग कौशल्यला महत्त्वाचे स्थान आहे देशाला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवायचे असेल तर खेडे हा घटक केंद्रबिंदू मानला पाहिजे खेडी स्वावलंबी व स्वयंपूर्ण कशी होतील या दिशेने पावले उचलली पाहिजेत गांधीजींचे आर्थिक विचारात ग्राम उद्योगाला महत्त्व दिले. ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी ग्राम उद्योगाला महत्त्व दिले. ग्राम उद्योगात प्रामुख्याने खाली उत्पादन हस्तकला व इतर लहान लहान उद्योग या उद्योगांना चालना देणे महत्त्वाचे आहे ग्रामोद्योगाचा विस्तार झाला तर खेड्यातील लोक शेतीची कामे आटोपल्यानंतर रिकाम्या वेळेमध्ये त्यांना रोजगार मिळतो काही प्रमाणात बेकारी कमी होते भारतामध्ये सहा लाख फेरी आहेत या खेड्यांच्या विकासावर भारत देशाचा विकास अवलंबून आहे कमीत कमी भांडवलात खेड्यामध्ये लघु व कुठून उद्योगाचा विकास करणे म्हणजेच देशाचा विकास होईल असे विचार गांधीजींनी मांडले.

### ५) श्रमाला महत्त्व

महात्मा गांधीजी म्हणतात काम कोणतीही सारखेच असते समाजात श्रमाला प्रतिष्ठा मिळायला पाहिजे महात्मा गांधी आपल्या जीवनात श्रमाला खूप महत्त्व दिले बौद्धिक श्रमाप्रमाणे शरीर श्रमाला महत्त्व प्राप्त झाले पाहिजे श्रमाला प्रतिष्ठा मिळवून द्यायचे असेल तर शारीरिक श्रमाला मिळणाऱ्या मोबदल्यात वाढ झाली पाहिजे बौद्धिक कार्याप्रमाणे शारीरिक कष्ट करणाऱ्या लोकांना योग्य वेतन मिळाले पाहिजे स्वतःचे काम स्वतःच करावे नोकरी करणारा नोकरदार आणि काम करणारा श्रमजीवी वर्ग यात फारसा फरक न होता दोघांनाही सामाजिक दर्जा सारख्याच स्वरूपात मिळवून दिला पाहिजे श्रीमंत असो वा गरीब सर्वांनीच काम केले पाहिजे महात्मा गांधीजींनी शारीरिक श्रमाला महत्त्वाचे मानले .

### ६) औद्योगीकरणाला विरोध

कामगार वर्गाला गुलाम करून देशांमध्ये बेकारी निर्माण करण्याचे काम औद्योगीकरणाच्या माध्यमातून केले जाते. यंत्र हे पूर्णतः नष्ट न करता त्यावर आवर घातला पाहिजे अशी गांधीजीचे मत होते कारण यंत्रामुळे त्याच्या कलात्मक प्रवृत्तीचा वय कौशल्याचा विकास होण्यास अडथळा येणार नाही याची काळजी घ्यावी अवजार यंत्रसामग्रीमुळे व्यक्तीच्या नैतिक अध्यात्मिक व सांस्कृतिक विकासाला खेळ बसते यंत्रामुळे बेरोजगारीत वाढ होते आणि बेरोजगारीमुळे अनेक आर्थिक सामाजिक राजकीय प्रश्न निर्माण होतो.

### ७) मोठ्या उद्योगाला विरोध

महात्मा गांधीजींना गरिबी हटवायची होती गरिबी हटवायचे असेल तर खेड्यातील लोकांना रोजगाराच्या संधी जास्तीत जास्त उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामीण भागात उद्योगधंदे स्थापन व्हावेत हे महत्त्वाचे आहे मोठमोठ्या उद्योगाला महात्मा गांधीजींनी विरोध दर्शविला महात्मा गांधीजींनी मोठ-मोठे उद्योग व्यवसाय यांत्रिकीकरण यांना विरोध केला ग्रामीण भागात लहान उद्योग व्यवसाया आवश्यक आहेत दारिद्र्य, बेकारीवर लहान उद्योग हा एक प्रभावी उपाय आहे.

### ८) उद्योगाचे विकेंद्रीकरण

महात्मा गांधीजींच्या मते उद्योगाचे केंद्रीकरण झाल्यास शहरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते त्यामुळे ग्रामीण भागातील रोजगार प्राप्तीसाठी लोकांचे शहराकडे स्थलांतर होईल त्यामुळे सामाजिक आर्थिक प्रदूषण आरोग्य झोपडपट्टी लोकांची गर्दी या समस्या निर्माण होतील म्हणून उत्पादनाचे विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे लहान लहान उद्योग

खेड्यामध्ये निर्माण झाल्यास संपत्तीचे विकेंद्रीकरण होऊन ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि ग्रामीण दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल.

**निष्कर्ष**

१. महात्मा गांधीजीच्या अर्थशास्त्रात मानवी मूल्यातील बदल अपेक्षित आहे.
२. आर्थिक विकेंद्रीकरणाचा मुद्दा गांधीजीच्या विचारात महत्त्वाचा आहे.
३. महात्मा गांधीजीच्या स्वप्नात आदर्श निर्माण करण्याची कल्पना होती.
४. शिक्षण आरोग्य पाणी वीज सुविधा ग्रामीण भागातील जनता पर्यंत पंचविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून ही योजना आखण्यात आली.
५. भारतासारख्या विकसनशील देशाला आजही गांधीवाद उपयुक्तच आहे.
६. महात्मा गांधीजीच्या स्वप्नातील ग्राम स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात येण्यास मदत होईल.
७. गांधीजींनी साधी राहणे व किमान गरजा यावर भर दिला.

**संदर्भ सूची**

१. डॉ. ग.ना. जोशी - महात्मा गांधी    विचार विमर्श
२. प्रा अ.रा.राखेलकर - आर्थिक विचारांचा इतिहास.
३. प्रा. नागोराव कुंभार - महात्मा गांधी : विचार दर्शन
४. प्राध्यापक डॉ. बी.डी. इंगळे - आर्थिक विचारांचा इतिहास
५. ब्रिजमोहन हेडा , महात्मा गांधीचे विचार , नवजीवन मुद्रणालय आमदाबाद